पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ ११३ /२०२३ दि. ०८/०८/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

*****

**ज्याअर्थी,** कल्याण डोंबिवली महानगरपालिका कडून कल्याण वाहतूक उपविभागाचे हद्दीतील छत्रपती शिवाजी महाराज चौक, कल्याण पश्चिम येथील भगवानदास मेन्शन तळ + तीन मजली इमारत अतिधोकादायक घोषित करून संदर्भ क्र. कडोमपा/३कप्रक्षे/अबांनि/३५०, दि. ०७/८/२०२३ अन्वये दि. १०/०८/२०२३ रोजी सकाळी १०:०० ते दि. ११/०८/२०२३ रोजी २०:०० वाजेपावेतो सदर इमारत निष्कासित करण्यात येणार असले बाबत कळविण्यात आलेले आहे. सदर वेळी छत्रपती शिवाजी महाराज चौक ते कल्याण स्टेशन दरम्यान होणारी वाहतूक पर्यायी मार्गाने वळविणे आवश्यक आहे. त्यामुळे गुरूदेव हॉटेल, कल्याण रेल्वे स्टेशन परिसरात वाहतूक कोंडी होण्याची दाट शक्यता असल्याने सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये सदर भागात वाहतूक सुरळीत व सुनिश्चित रहावी, याकरीता आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) कल्याण शहरातून छत्रपती शिवाजी महाराज चौक – पुष्पराज हॉटेल मार्गे कल्याण रेल्वे स्टेशनचे दिशेने जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने गुरूदेव हॉटेल, कल्याण रेल्वे स्टेशन, दिपक हॉटेल मार्गे इच्छीत स्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसुचना दि. १०/०८/२०२३ रोजी सकाळी १०:०० ते दि. ११/०८/२०२३ रोजी २०:०० वाजेपावेतो इमारतीचे निष्कासन होईपावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
ठाणे पोलीस पत्रक.

**प्रत** :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**प्रत** :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :— स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग, पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली वाहतूक उपविभाग.
कार्यकारी अभियंता, (विशेष प्रकल्प) कल्याण—डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.
२/— आपणास विनंती करण्यात येते की, आपण मोटार वाहन कायद्याचे कलम ११६(१)(अ)(ब) अन्वये संबंधित ठिकाणी फलक लावणेबाबत आपले अधिनस्थ संबंधितांना आदेश निर्गमित होणेस विनंती आहे.